पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

वाशिम ■ वर्ष १ ■ अंक १० ■ गुरुवार, दि. ४ जून २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पुष्ठे ४

Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# भूमि अभिलेख विभागातील गैरव्यवहाराचा पर्दाफाश

## निलंबित उपअधीक्षक पंकज पवार यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल

News सिटी न्यूज सुपरफास्ट IMPACT

प्रतिनिधी ४ जून

**अकोला:** अकोला भूमी अभिलेख कार्यालयातील तत्कालीन आणि सध्या निलंबित असलेले उपअधीक्षक पंकज शिवदास पवार यांच्याविरुद्ध प्रशासकीय अधिकारांचा गैरवापर, फसवणूक आणि शासकीय दप्तरात मोठ्या प्रमाणावर फेरफार केल्याप्रकरणी अखेर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पण, या सर्व प्रकरणात तोंडी आदेश देणारे आणि चौकशी समितीत सदस्य असणाऱ्यांना या सर्व प्रकरणात वगळण्यात आले आहे. इतकेच नाही तर ज्या विविध प्रकरणात विभागीय चौकशी सुरु आहे. त्याच प्रकरणात फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल करणे हे कितपत न्यायोचित आहे असा ही प्रश्न विचारला जात आहे. या सर्व प्रकरणात तपास अधिकाऱ्यांना अद्याप चौकशी समितीचा पुर्ण अहवाल का दिला नाही अशी विचारणा होत आहे. त्याच बरोबर केवळ उपअधिक्षक पंकज पवार हेच कसे काय गुन्हेगार ठरले. लाभार्थ्यांच्या






बरोबर, विभागातील एजंट आणि विभागातील त्यांच्या कनिष्ठांनी जो अहवाल विविध प्रकरणात दिला त्यानंतर त्यांनी मान्यता दिली. इतकेच नाही तर केवळ उपअधिक्षक यांच्या मान्यतेने प्रकरण पुर्णत्वास गेले नाही काही प्रकरणात वरिष्ठांनी सरकारी पोर्टलवर से दिल्यानंतरच प्रकरणे मार्गी लागली असे असताना केवळ एकटा पंकज पवार याला दोषी ठरवित इतर आरोपींना वगळण्याचा उद्योग केला कोणी असा प्रश्न उपस्थित होत आहे. निलंबित उपअधिक्षक पंकज पवार यांच्या १ जून २०२३ ते ३० जून २०२५ या कार्यकाळातील कामकाजाची सखोल चौकशी करण्यात आली होती. अमरावती प्रदेशचे भूमी अभिलेख उपसंचालक आणि पुणे जमाबंदी आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या चौकशीचा अहवाल २ जानेवारी २०२६ रोजी सादर करण्यात आला होता. या अहवालात पवार यांनी पदाचा गैरवापर करून गंभीर गैरव्यवहार केल्याचे निष्पन्न झाले आहे.

या सर्व गंभीर बाबींचा विचार करून भूमी अभिलेख अमरावती उपसंचालकांच्या निर्देशानुसार, अकोल्याच्या जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख भारती खंडेलवाल यांनी सिटी कोतवाली पोलिसात तक्रार दिली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत असून, या रॅकेटमध्ये महसूल विभागातील आणखी काही अधिकाऱ्यांचा किंवा कर्मचाऱ्यांचा सहभाग आहे का, याचाही शोध घेतला जात आहे.

### चौकशीत समोर आलेले गंभीर गैरप्रकार

- पवार यांनी शासकीय सेवेत असताना शासनाचा विश्वासघात करून खाजगी व्यक्तींच्या फायद्यासाठी अनेक बेकायदेशीर कृत्ये केल्याचे चौकशीत स्पष्ट झाले आहे. या प्रकरणात नेमके खाजगी व्यक्ती कोण त्यांचा तपशील मात्र जाहिर करण्यात आला नाही.
- तब्बल १५ प्रकरणांमध्ये मालमत्तेचे अधिकार, सत्ता प्रकार बदलणे आणि मयत खातेदारांच्या नावे नियमबाह्य पद्धतीने अर्ज मंजूर करणे. यातील संबंधित मालमत्ताधारक कोण, त्यांचे एजंट कोण, त्यांचे प्रकरणे कुठल्या ज्युनिअर आणि सिनिअरने मंजुर केले.
- ७ प्रकरणांमध्ये तात्पुरत्या भाडेपट्ट्याच्या मिळकत पत्रिका तयार करणे, तसेच केवळ जागेची पाहणी करून नवीन मिळकत पत्रिका नियमबाह्यपणे बनवणे. यातील लाभार्थी कोण अशी विचारणा आता सुरु झाली आहे. त्यामुळे त्यांच्यावर शासकीय कागदपत्र बनावट केल्याचा गुन्हा का दाखल नाही.
- खाजगी व्यक्तींच्या फायद्यासाठी मालमत्तेचे क्षेत्र वाढवणे, सार्वजनिक सुविधांच्या जागांवर खाजगी व्यक्तींची नावे नोंदवणे आणि जमिनींचे एकत्रिकरण (सामिलीकरण) करताना क्षेत्रफळ वाढवणे. हा उद्योग कोणासाठी केला आणि त्याच्या नावाचा उल्लेख का नाही अशी विचारणा केली जात आहे.
- महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १५५ चे उल्लंघन करून अधिकाराबाहेर जाऊन आदेश देणे आणि प्रमाणपत्रे वाटणे. असे करताना ज्या लाभार्थ्यांसाठी हा सरकारी दस्त बदलण्यात आला त्याच्या विरोधात गुन्हा दाखल होण्याची गरज व्यक्त केली जात आहे.
- अकोला महानगरपालिकेकडे भूसंपादनाद्वारे हस्तांतरित झालेल्या शासकीय जागेवर खाजगी व्यक्तींची नावे बेकायदेशीरपणे चढवणे. हा खाजगी व्यक्ती कोण ज्याच्या नावावर शासकीय जागेचा भाग दिला गेला. त्यांच्या विरोधात गुन्हा का दाखल केला गेला नाही. अशी विचारणा होत आहे.

# कौलखेड स्कूल ऑफ स्कॉलर्सची लिज तर कधीची संपली

## ▶▶ अकोला महापालिकेचा भोंगळ कारभार आला समोर ▶▶ मनसे नेत्यांनी जमीन मोकळी करण्याची केली मागणी




प्रतिनिधी ४ जून

**अकोला:** कौलखेड येथील स्कुल ऑफ स्कॉलर्सची लीज तर करारानंतर आठ वर्षात संपली आहे. तरी देखील महापालिकेच्या भ्रष्ट अधिकाऱ्यांनी त्याकडे का लक्ष दिले नाही असा प्रश्न मनसे जिल्हाध्यक्ष पंकज साबळे यांनी केला आहे. स्थानिक नागरिकांच्या हक्काची ओपन स्पेस त्यांना त्वरीत खुली करुन देण्याची मागणी मनसेने केली आहे.

कौलखेड येथील स्कुल ऑफ स्कॉलर्स ही ओपन स्पेस मध्ये बांधल्या गेली आहे. ओपन स्पेस मध्ये बांधकाम करताना महापालिकेसोबत झालेल्या करारानुसार केवळ दहा टक्के बांधकामाची परवानगी अपेक्षित आहे. पण, ग्रीन झोन ची जागा ताब्यात ठेवत दहा टक्के पेक्षा अधिकचे बांधकाम स्कुल ऑफ स्कॉलर्सने केल्याची धक्कादायक माहिती मिळाली आहे. ओपन स्पेस स्थानिकांसाठी खुली न ठेवता ती कपाउंडवॉल घेत बंदिस्त केल्या गेली. इतकेच नाही तर शाळेचे चौकीदार स्थानिकांना हाकलून लावत असल्याची धक्कादायक माहिती मिळाली. स्कुल ऑफ स्कॉलर्स ने ओपन स्पेस त्वरीत स्थानिकांसाठी खुली करावी अशी मागणी मनसे जिल्हाध्यक्ष पंकज साबळे यांनी केली आहे.

दरम्यान, या विषयावर महापालिकेच्या नगर रचनाकार साबळे यांनी देखील कौलखेड येथील स्कुल ऑफ स्कॉलर्सच्या जागेविषयी असा धक्कादायक खुलासा केला आहे. त्यांनी देखील या विषयी माहिती देताना केवळ आठ वर्ष काही महिन्यांसाठी ही जागा लिजवर दिली होती. त्यानंतर नाही. त्यामुळे महापालिकेच्या कुठले अधिकारी या फाईलवर बसले होते. त्यांनी स्कुल ऑफ स्कॉलर्सची ओपन स्पेस स्थानिकांसाठी खुली का केली नाही अशी विचारणा आता सुरु झाली आहे. तर महापालिकेने नुकत्याच घेतलेल्या ठरावानुसार स्कुल ऑफ स्कॉलर्सची ओपन स्पेस स्थानिकांना सत्तारुढ भाजप मिळवून देईल काय अशी विचारणा होत आहे. दरम्यान, स्कुल ऑफ स्कॉलर्स व्यवस्थापन, मुख्याध्यापक यांच्याशी आम्ही संपर्क केला असता तो झाला नाही. तर त्यांच्या चौकीदाराने आमच्या प्रतिनिधींनी आत सोडलेच नाही.

### कौलखेड स्कूल ऑफ स्कॉलर्सचा भाडेपट्टा संपला

▶▶ मौजा कौलखेड मंजूर अभिन्यासात खुली जागा २३४१ स्वे.मी होती. त्यापैकी खुल्या जागेपैकी १-टक्के जागा म्हणजे २४३ स्वे.मी ही जागा स्वर्गीय राधिकाबाई मेघे महिला शिक्षण संस्था तर्फे सचिव श्रीमती सुमिती राजेंद्र वानखडे यांना दिनांक २३ फेब्रुवारी २००६ रोजी ८ वर्ष ११ महिन्याच्या कालावधीसाठी भाडेपट्ट्याने दिली होती. त्यानंतरची जी काही कारवाई करायची होती, एकतर भाडेपट्टा वाढवण्याच्या संदर्भात किंवा खाली करण्यासंदर्भात, त्या संदर्भातली कारवाई महापालिकेकडून प्रलंबित आहे. सदर कारवाई महापालिकेतर्फे प्रस्तावित करण्यात येत आहे. सदर जागा ही कोणत्या परिस्थितीत संबंधितांना भाडेपट्ट्यावर दिलेली आहे, याचं सखोल प्रत्यक्षरीत्या स्थळ पाहणी करून, नेमकं भाडेपट्ट्यावर देण्यात आल्यानंतर किती बांधकाम जास्त केलं, किती कालावधी जास्त हे केला आणि कोणत्या वापरासाठी त्यांनी व्हायलेशन केलं, याबाबीची सविस्तर तपासणी करून पुढील कारवाई प्रस्तावित करण्यात येईल.

**साबळे नगर रचनाकार,** महापालिका अकोला.

### स्कूल ऑफ स्कॉलर्स खाली करु



▶▶ कौलखेड येथील स्कूल ऑफ स्कॉलर्स एखाद्या खुल्या जागेवर १० टक्के पेक्षा जास्त बांधकाम केले गेले असेल, तर ती जागा सध्याच्या कब्जेदाराकाकडून परत ताब्यात घेतली जाईल व पाडण्यात येईल. ताब्यात ओपन स्पेस देखभाल आणि दुरुस्तीसाठी त्याच परिसरातील स्थानिक नागरिकांच्या स्वाधीन केली जाईल. खुल्या जागांवर ज्यांनी बेकायदेशीरपणे ताबा मिळवला आहे, त्यांच्यावर कडक कारवाई करून त्या जागा खाली करून घेतल्या जातील.

**विजय अग्रवाल**
सभापती, स्थायी समिती मनपा, अकोला.

# पाच दिवसांत 78 धाडी ; 18 लाखांची दारू जप्त

## गावठी दारुसाठा नष्ट करताना पथकातील पोलिस अधिकारी व कर्मचारी

प्रतिनिधी ४ जून

**वाशिम :** जिल्ह्यात गावठी हातभट्टी दारू निर्मिती व विक्रीला आळा घालण्यासाठी पोलिसांनी विशेष मोहीम हाती घेत धडक कारवाई सुरू केली आहे. २९ मे ते २ जून या पाच दिवसांत ७८ ठिकाणी कारवाई करीत दारूसह सुमारे १८ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पुणे जिल्ह्यात विषारी दारू (दारूबळी) प्यायल्याने काही जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या प्रकरणामुळे राज्यभरात मोठी खळबळ उडाली असून, राज्य उत्पादन शुल्क विभाग व पोलिस यंत्रणा सतर्क झाली आहे. जिल्ह्यात कुठेही अवैध हातभट्टी निर्मिती व दारू विक्री होऊ नये, असे सक्त निर्देश पोलिस अधीक्षक निकेश खाटमोडे-पाटील यांनी सर्व पोलिस ठाणे प्रभारी अधिकाऱ्यांना दिले आहेत. या पार्श्वभूमीवर २९ मे ते २ जून २०२६ या कालावधीत जिल्ह्यात विविध ठिकाणी अवैध दारू निर्मिती व विक्री करणाऱ्यांवर धाडी टाकण्यात आल्या. पाच दिवसांत ७८ ठिकाणी कारवाई करण्यात आली. या कारवायांमध्ये देशी विदेशी तसेच गावठी हातभट्टी दारूसह सुमारे १८ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त ७८ ठिकाणी कारवाईची मोहीम राबविण्यात आली.



### दारू विक्रेत्यांचे धाबे दणाणले!

या कारवाईमुळे अवैध दारू व्यवसाय करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. जिल्ह्यातून अवैध गावठी हातभट्टी दारूचे समूळ उच्चाटन करण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन पोलिस अधीक्षक निकेश खाटमोडे-पाटील यांनी केले आहे. जिल्ह्यात कुठेही अवैध दारू विक्री होत असल्याची माहिती पोलिस नियंत्रण कक्ष किंवा संबंधित पोलिस ठाण्याला द्यावी. माहिती देणाऱ्याची ओळख गोपनीय ठेवण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

करण्यात आला. ही कारवाई पोलिस अधीक्षक निकेश खाटमोडे-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अपर पोलिस अधीक्षक लता फड, उपविभागीय पोलिस अधिकारी वाशिम, मंगरुळपीर व कारंजा, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक व त्यांचे पथक तसेच सर्व पोलिस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी संयुक्तपणे राबविली.

# मान्सून केरळमध्ये दाखल!

वृत्तसंस्था ४ जून

**तिरूअनंतपुरम :** केरळमध्ये मान्सून दाखल झाल्याची अधिकृत घोषणा भारतीय हवामान विभागाने केली. पुढील ४८ तासांत कोकण आणि दक्षिण महाराष्ट्रात पावसाची शक्यता वर्तवण्यात आली असून, विदर्भातील मान्सूनसाठी १५ जूनपर्यंत प्रतीक्षा करावी लागू शकते.

पुढील २-३ दिवसात मोसमी वारे महाराष्ट्रातील काही भाग व्यापू शकतात, अशी भारतीय हवामान विभागाची माहिती आहे. पुढील २-३ दिवसांत गोवा, महाराष्ट्राचा काही भाग, सोबतच तामिळनाडू, कर्नाटक, बंगालचा उपसागराचा काही भाग आणि ईशान्य भारतातील काही राज्यांमध्ये मान्सूनच्या आगमनासाठी अनुकूल परिस्थिती आहे. मान्सून केरळात १ जून रोजी दाखल होत असतो, मात्र यंदा तो ३ जून रोजी दाखल झाला आहे. याचदरम्यान, हवामान विभागाचे तज्ज्ञ प्रवीण कुमार यांनी महत्वाची माहिती दिली आहे. केरळमध्ये मान्सून धडकला असून यंदा तीन दिवस उशिराने आला आहे.

### पुढील ४८ तासांत कोकणात पाऊस

विदर्भात तापमान ४० ते ४२ अंशाचा घरात राहील. १० जून नंतर तापमान कमी होईल. केरळला सामान्यतः एक जूनच्या सुमारास दाखल होतो. आता तीन दिवस उशिरा केरळमध्ये दाखल झाला आहे. पुढील ४८ तासांत दक्षिण महाराष्ट्र त्यामध्ये कोकण मधला भाग तिथे पावसाचा अंदाज आहे, असं प्रवीण कुमार यांनी सांगितले.

### विदर्भात वादळीवाऱ्याचा मध्यम स्वरूपाचा पाऊस

मान्सूनच्या अनुषंगाने परिस्थिती अनुकूल आहे. विदर्भात साधारणतः १५ जूनच्या सुमारास मान्सून दाखल होतो. विदर्भात पुढील काही दिवस वादळीवाऱ्याचा मध्यमस्वरूपाचा पाऊस होईल. मात्र आता येणारा पाऊस हा अवकाळीच असेल, कारण मान्सूनच्या अनुषंगाने अजून विदर्भात अनुकुल वातावरण निर्माण व्हायचे आहे.

# राज्यस्तरीय पथकाकडून कामांची पडताळणी!

प्रतिनिधी ४ जून

**वाशिम :** मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या ग्रामपंचायतींच्या मूल्यमापनासाठी जिल्हा परिषद गोंदिया येथील राज्यस्तरीय तपासणी समिती जिल्ह्यात दाखल झाली असून, वाशिम तालुक्यातील शेलू बुद्रुक आणि जांभरून परांडे या ग्रामपंचायतींची करण्यात आली.

समितीचे नेतृत्व जिल्हा परिषद गोंदियाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रमिला जाखलेकर यांनी केले. समितीत उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) मधुकर वासनिक, प्रकल्प संचालक जलजीवन मिशन तथा उपजिल्हा कार्यक्रम समन्वयक (मनरेगा) विजय लोंढे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) पवन खंदारे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी निरंजन अग्रवाल, विस्तार अधिकारी (सांख्यिकी) वैशाली खोब्रागडे तसेच सुरेंद्र टेंबरे व धर्मराज लंजे यांचा समावेश आहे. शेलू बुद्रूक येथे पाहणीच जिल्हासास्थि माननिय समितीचे अभियाना अंतर्गत शेलू बु. येथे पाहणी करताना उपस्थित मुख्य कार्यकारी अधिकारी प्रमिला जाखलेकर,



मधुकर वासनिक, गजानन खुळे व अन्य.

#### गावांतील विकासात्मक कामांची पाहणी होणार

ग्रामविकास, स्वच्छता, स्मशानभूमीचे सुशोभिकरण, जलव्यवस्थापन आणि लोकसहभागातून राबविण्यात आलेल्या उपक्रमांची पाहणी करण्यात आली. तर जांभरून परांडे येथे विविध विकासकामे, सार्वजनिक सुविधा आणि ग्रामस्थांच्या सहभागातून साकारलेल्या उपक्रमांचे सादरीकरण समितीसमोर केले. पाहणीदरम्यान वाशिम पंचायत समितीचे गटविकास अधिकारी रवींद्र सोनोने, रिसोडचे

गटविकास अधिकारी गजानन खुळे, वाशिमचे विस्तार अधिकारी दीपकसिंग सोळंके, विनय बोरचाटे, उपअभियंता (बांधकाम) खोडवे, उपअभियंता (ग्रामीण पाणीपुरवठा) मार्गे तसेच पंचायत समिती व तालुकास्तरीय विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. समितीने अभियानाच्या निकषांनुसार गावांमधील विकासकामे, स्वच्छता व्यवस्थापन, पाणीपुरवठा, आरोग्य, शिक्षण, पर्यावरण संवर्धन, ग्रामविकास उपक्रम तसेच ग्रामपंचायतींचे प्रशासकीय व आर्थिक दस्तऐवजाची पाहणी केली.

#### लोककलेतून विकासकामांचे सादरीकरण

शेलू बुद्रूक येथे लोकशाहीर उत्तम उर्फ धम्मानंद इंगोले यांनी ग्रामविकासाच्या कामांचे लोककलेच्या माध्यमातून प्रभावी सादरीकरण केले. यावेळी पथक प्रमुख तथा मुख्य कार्यकारी अधिकारी प्रमिला जाखलेकर यांनी त्यांच्या कलागुणांचे विशेष कौतुक केले.

# शासनाच्या नवीन निर्णयास शिक्षकांमधून विरोध; गणवेश वितरण प्रक्रिया अडचणीत ?

**वाशिम :** मोफत गणवेश योजनेबाबत २९ मे २०२६ रोजी जारी करण्यात आलेल्या शासन निर्णयातील तरतुदी शाळास्तरावर राबविणे शक्य नसल्याचा दावा करत महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या वतीने ३ जून रोजी शिक्षणाधिकाऱ्यांमार्फत शालेय शिक्षणमंत्र्यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनानुसार, राज्यातील शाळा १५ जूनपासून सुरू होत असून, पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना गणवेशाचे दोन संच वितरित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत; मात्र मुख्याध्यापक व शिक्षक सध्या जनगणना-२०२७तसेच मतदार यादी पडताळणीच्या कामात व्यस्त असल्याने नव्या शासन निर्णयानुसार गणवेश योजनेची अंमलबजावणी करणे अशक्य आहे. अव्यवहार्य असल्याचे निवेदनात म्हटले आहे. शासनाने दोन्ही गणवेशांसाठी संपूर्ण अनुदान आगाऊ स्वरूपात उपलब्ध करून द्यावे, तसेच २९ मे २०२६ चा शासन निर्णय स्थगित करून पूर्वीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी समितीने केली. यावेळी जिल्हाध्यक्ष विनोद घुगे, ग. का. राऊत, सुधीर काळे, सतीश सांगळे, संतोष शिकारे, राजू महाले, ज्ञानेश्वर कहाकर, प्रमोद गरकळ, सुनील भोयर, विजय भुरकाडे, संतोष नागरे, रमेश बेले, दिलीप अखंड, विजय पाचपिले, प्रशांत देशमुख, अनिल चीनगोले, अमित भुजबळ, दिलीप गाडे, शरद सुरशे, नीलेश तुळजापुरे, राजू भेंडेकर, प्रवीण चिंचे, अशोक ताथोड, दत्तात्रय दिघडे, नीलेश सोनकुसरे, अर्जुन लोंढे, जी. टी. होलगरे व दीपक जायभाये आदी पदाधिकारी उपस्थित होते. याशिवाय, बहुतांश शाळांनी यापूर्वीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार गणवेश खरेदीची प्रक्रिया सुरू केली असल्याचेही समितीने स्पष्ट केले.

# पेरणीपूर्वी पावसाच्या अंदाजावर शेतीचे योग्य व्यवस्थापन करणे आवश्यक!

खरीप शेती म्हणजे केवळ बियाणे पेरणे नव्हे, तर शहाणपणाची पावले उचलणे, वेळेवर निर्णय घेणे जे आपल्याला अनिश्चिततेपासून वाचवतात. पावसाचा मागोवा घेण्यापासून ते योग्य वाण निवडण्यापर्यंत, मातीची काळजी घेण्यापासून ते विम्याद्वारे पिकांचे संरक्षण करण्यापर्यंत, प्रत्येक पायरी आपल्यासाठी महत्वाची आहे. आजचा शेतकरी मात्र केवळ शेतकरी नाही, तर जोखीम व्यवस्थापकही आहे. बदलते हवामान, बाजारातील



बदलती मागणी आणि वाढता खर्च यामुळे केवळ पारंपरिक पद्धती पुरेशा राहिलेल्या नाहीत. येथेच तयारी, नावीन्य आणि सुरक्षिततेच्या उपाययोजना अंमलात येतात.आत्मविश्वासाने नियोजन करून आणि योग्य उपायांनी पिकांचे संरक्षण करून आपल्या खरीप शेती हंगामावर नियंत्रण ठेवा. कारण जेव्हा तुम्ही चांगली तयारी करता तेव्हा तुमची वाढ चांगली होते आणि तोच सोयीस्कर, पर्यावरणपूरक शेतीचा आधार असतो. खरीप हंगाम (जून ते ऑक्टोबर) हा भारतातील मुख्य शेती हंगाम आहे. या काळात चांगल्या उत्पादनासाठी योग्य जमिनीची मशागत, बियाण्यांची निवड, बीजप्रक्रिया, खतांचे योग्य व्यवस्थापन आणि पावसाच्या अंदाजावर आधारित पीक नियोजन करणे अत्यंत गरजेचे आहे.

**१. पूर्व मशागत आणि जमीन तयार करणे**
पावसाळयापूर्वी शेताची खोल नांगरणी करून घ्यावी, शेतातील कचरा, धसकटे वेचून शेत स्वच्छ करावे, शेवटच्या पाळीपूर्वी १० ते १२ गाड्या चांगले कुजलेले शेणखत जमिनीत मिसळावे, भारी जमिनीत पाण्याचा निचरा होण्यासाठी रुंद वरंबा आणि सरी पद्धतीचा वापर करावा.

**२. बियाण्यांची निवड आणि बीजप्रक्रिया**
पेरणीपूर्वी आपल्या जमिनीनुसार आणि कृषी विद्यापीठांनी शिफारस केलेल्या संकरित किंवा सुधारित वाणांचीच निवड करावी, बियाण्यांची उगवणक्षमता तपासून घ्यावी, पेरणीपूर्वी बियाण्यांना 'बीजप्रक्रिया' करणे आवश्यक आहे. यामुळे बुरशीजन्य रोग आणि किडींचा प्रादुर्भाव सुरुवातीलाच रोखता येतो. यासाठी ट्रायकोडर्मा, कार्बेन्डाझिम किंवा रायझोबियमचा वापर करावा.

**३. पेरणी कधी करावी-**
मॉन्सूनचे आगमन झाल्यानंतर जमिनीत ८० ते १०० मिमी पाऊस पडल्यामुळे वापसा (पेरणीयोग्य ओलावा) आल्यावरच पेरणी करावी. घाईघाईने कोरड्या जमिनीत किंवा कमी पावसात पेरणी करू नये. साधारणपणे जूनचा दुसरा आठवडा ते जुलैचा पहिला आठवडा हा पेरणीसाठी सर्वात योग्य कालावधी मानला जातो.

**४. खतांचे व्यवस्थापन-**
माती परीक्षण अहवालानुसारच रासायनिक खतांचा वापर करावा. पेरणीच्या वेळी संपूर्ण स्फुरद आणि पालाश द्यावे आणि नत्रचा पहिला हप्ता द्यावा. खते बियाण्यांच्या खाली २-३ सेमी अंतरावर पडतील, अशी पेरणी यंत्राची रचना असावी.

**५. तण नियंत्रण-**
पिकाच्या सुरुवातीच्या ३० ते ४५ दिवसांत शेत तणमुक्त ठेवणे महत्त्वाचे असते. यासाठी वेळेवर खुरपणी करावी किंवा आंतरमशागतीची कामे (डवरणी/कोळपणी) करावीत. तणनाशकांचा वापर करताना कृषी तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

# आरोग्यदायी जीवनशैलीचा संदेश देण्यासाठी सायकल चालविणे उपयुक्त

दोन शतकांपासून वापरात असलेल्या सायकलचे वेगळेपण, दीर्घायुष्य आणि बहुउपयोगिता, तसेच ते वाहतुकीचे एक साधे, परवडणारे, विश्वासार्ह, स्वच्छ, पर्यावरणास अनुकूल आणि टिकाऊ साधन असून ते पर्यावरण संवर्धन आणि आरोग्यास प्रोत्साहन देते, हे मान्य करून आमसभेने ३ जून हा जागतिक सायकल दिन म्हणून घोषित करण्याचा निर्णय घेतला. यामुळे संबंधित घटकांना शाश्वत विकासाला चालना देणे, मुलामुलींसाठी शारीरिक शिक्षणासह शिक्षण अधिक मजबूत करणे, आरोग्याला प्रोत्साहन देणे, आजारांना प्रतिबंध करणे, सहिष्णुता, परस्पर सामंजस्य आणि आदर यांना प्रोत्साहन देणे, तसेच सामाजिक समावेशन आणि शांततेच्या संस्कृतीला चालना देणे यांसारख्या बाबींसाठी सायकलच्या वापरावर भर देण्यास आणि त्याला पुढे नेण्यास प्रोत्साहित केले गेले.



दरवर्षी ३ जून रोजी 'जागतिक सायकल दिन' साजरा केला जातो?सायकलचा वापर वाढावा, त्याद्वारे लोकांचे आरोग्य चांगले राहावे आणि पर्यावरणाचे रक्षण व्हावे, या उद्देशाने संयुक्त राष्ट्राने २०१८ मध्ये या दिनी अधिकृत घोषणा केली. सायकलचे मानवी आरोग्यासाठी आणि पर्यावरणासाठी काय फायदे आहेत.

दुचाकी सायकल ही वापरण्यास आणि विकत घेण्यास सोपी आणि स्वस्त असा वाहन पर्याय आहे. त्यामुळे सर्वांना सामावून घेणारे जागतिक स्तरावरील वाहन म्हणून सायकल कडे पाहणे याबद्दल हा दिवस साजरा करण्याचे ठरविले गेले. समाजतील कोणत्याही स्तरातील व्यक्तींना सायकल चालविण्याचा आनंद घेता यावा यासाठी या दिवशी विशेष सायकल यात्रा आयोजित केल्या जातात. सायकल हे वाहन सहिष्णुता, मानवता यांचे प्रतीक आहे असा संदेश यातून पोहोचविण्याचा प्रयत्न केला जातो. आरोग्यदायी जीवनशैलीचा संदेश देण्यासाठी सायकल चालविणे उपयुक्त आहे, असा संदेश यानिमित्ताने दिला जातो. २०१५ साली लेझेक सिबिस्की या समाजिक शास्त्र विषयाच्या प्राध्यापकांनी सर्वांसाठी सायकल याविषयी लेख लिहिला. त्यानंतर जाणीव जागृती होऊन सायकल विषयासाठी विशेष दिवस राखून ठेवणे याला महत्व मिळाले. सायकल हे निर्धुर बाहन असल्याने त्यामुळे हवेचे प्रदूषण होत नाही. जागतिक स्तरावरील पर्यावरण प्रश्न वाढता असल्याने सायकल चालवून हवेहे प्रदूषण कमी करण्याचा जागतिक पातळीवरील महत्वाचा संदेश या दिवशी दिला जातो

मध्यम तीव्रतेच्या नियमित शारीरिक हालचालींचे – जसे की चालणे, सायकल चालवणे किंवा खेळ खेळणे – आरोग्यासाठी महत्त्वपूर्ण फायदे आहेत. सर्व वयोगटांमध्ये, शारीरिकदृष्ट्या सक्रिय राहण्याचे फायदे हे अपघातांसारख्या संभाव्य धोक्यांपेक्षा जास्त असतात. काहीच शारीरिक हालचाल न करण्यापेक्षा थोडीफार हालचाल करणे चांगले. दिवसभरात तुलनेने सोप्या मार्गांनी अधिक सक्रिय राहून, लोक शिफारस केलेली सक्रियतेची पातळी अगदी सहजपणे गाठू शकतात. जागतिक आरोग्य संघटनेनुसार, चालण्यासाठी आणि सायकलिंगसाठी सुरक्षित पायाभूत सुविधा निर्माण करणे हा देखील अधिक आरोग्य समानता साधण्याचा एक मार्ग आहे. सर्वात गरीब शहरी घटकांसाठी, ज्यांना अनेकदा खाजगी वाहने परवडत नाहीत, चालणे आणि सायकलिंग हे वाहतुकीचे एक साधन ठरू शकते, ज्यामुळे हृदयविकार, पक्षाघात, काही प्रकारचे कर्करोग, मधुमेह आणि मृत्यूचा धोकाही कमी होतो. त्यानुसार, सुधारित सक्रिय वाहतूक केवळ आरोग्यदायीच नाही, तर ती न्याय्य आणि किफायतशीर देखील आहे. पायी चालणाऱ्या आणि सायकल चालवणाऱ्या लोकांच्या गरजा पूर्ण करणे, हे शहरांना लोकसंख्या वाढीपासून होणारे उत्सर्जन वेगळे करण्यास, तसेच हवेची गुणवत्ता आणि रस्त्यांवरील सुरक्षितता सुधारण्यास मदत करणाऱ्या गतिशीलता उपायांचा एक महत्त्वाचा भाग आहे. कोविड-१९ महामारीमुळे अनेक शहरांना त्यांच्या वाहतूक प्रणालींचा पुनर्विचार करण्यासही भाग पडले आहे.

जागतिक सायकल दिन सायकल वापरण्याच्या फायद्यांकडे लक्ष वेधतो, जे वाहतुकीचे एक साधे, परवडणारे, स्वच्छ आणि पर्यावरणास अनुकूल असे शाश्वत साधन आहे. सायकलमुळे हवा अधिक स्वच्छ राहते, वाहतूक कोंडी कमी होते आणि शिक्षण, आरोग्यसेवा व इतर सामाजिक सेवा सर्वात असुरक्षित लोकसंख्येसाठी अधिक सुलभ होतात. आर्थिक वाढीस चालना देणारी, असमानता कमी करणारी आणि हवामान बदलाच्या विरोधातील लढ्याला बळ देणारी एक शाश्वत वाहतूक व्यवस्था, शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करण्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे.

१५ मार्च २०२२ रोजी, आमसभेने शाश्वत विकासासाठी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेमध्ये सायकलिंगला मुख्य प्रवाहात आणण्यासंबंधीचा ठराव संमत केला . यामध्ये यावर भर देण्यात आला की, सायकल हे शाश्वत वाहतुकीचे एक साधन असून ते शाश्वत उपभोग आणि उत्पादनाला चालना देण्यासाठी एक सकारात्मक संदेश देते, तसेच हवामानावरही त्याचा सकारात्मक परिणाम होतो.

# नगराध्यक्ष केंदळे अनिल, शहरातील समस्या करताहेत नील !



अभियंता श्री.अनिल केंदले यांनी नगराध्यक्ष पदाची सूत्रे घेऊन आज जवळ जवळ १५० दिवस पूर्ण झालेत. १५० दिवसात एखादा राजकारणात नवखा असलेला माणूस काय करेल ? त्यातही एखादा सज्जन, सहृदयी माणूस असेल तर कठीणच ! त्यात हे क्षेत्र म्हणजे ' येथे समस्त दुर्जन असतात लोकं ' अशी राजकारणाची ख्याती.

त्यामुळे सहाजिकच ' एक अकेला अनिल केंदले क्या करेगा ? अशी सर्वसामान्यांची प्रतिक्रिया होती.

पण एक शिकलेला,अभियंती वृत्ती असलेला माणूस ' योजक: तत्र दुर्लभ: ' ठरला.नियोजनबद्ध ,पारदर्शी आणी शिस्तबद्ध कारभारी असला तर काय करू शकतो हे आपल्याला १५० दिवसात दिसले.कुठलाही आततायीपणा नाही,आगाऊ मोठमोठ्या गप्पा नाहीत ,प्रसिद्धीचा हव्यास नाही , बडेजाव तर अजिबात नाही.सर्व अगदी शांतपणे,नियोजनानुसार ,ठाम भूमिका घेऊन लोकहिताची कामे श्री.अनिलभाऊ केंदले करतांना दिसताहेत. खर सांगू ! भाजपा उबाठा एकत्रित येण्याला माझा विरोध होता तो आजही आहे.सभागृहात विरोधी पक्ष हवाच यावर मी आजही ठाम आहे.गावाच्या दृष्टीने ते हितावह असते. शिवाय सर्व एकत्र आले तर ते केंदले साहेबांसारख्या संवेदनशील माणसाला गुंडाळून टाकतील असे माझे मत होते.

पण १५० दिवसाचा कार्यभार पाहता तसे होतांना दिसत दिसत नाही.सर्व नगरसेवक त्यांना शिस्तीत सहकार्य करतांना दिसत आहेत.आजवरच्या इतिहासात जितके सक्रिय नसतील तितके नगरसेवक प्रभागात सक्रिय होतांना दिसत आहेत.न.प.चे अधिकारी कर्मचारी देखिल बऱ्यापैकी कार्यतत्पर झालेले दिसत आहेत.

नगराध्यक्ष म्हणून खरे उतरण्याचा त्यांचा प्रामाणिक प्रयत्न आहे.सगळे एकदम होणार नसले तरी प्रयत्न अचूक आणी प्रामाणिक आहेत.जे जे आम्हाला अपेक्षित आहे ते ते करण्याचा त्यांचा प्रयास कौतुकास्पद आहे.

छोटी अपेक्षा - आता एकदा टेम्पल गार्डन तूर्त जुजबी दुरुस्ती करून ' आहे त्या स्थितीत ' लोकांसाठी खुले करून द्या.दुरुस्त्या होत राहतील यथावकाश !लहान मुले,माता भगिनी,ज्येष्ठ नागरिक येतील तिथे.थोडेफार भेळ,आईसक्रीम,आकाशपाळणे,अशांना सशुल्क परवानगी द्या.असो !

श्रीमान अनिलजी केंदले साहेब ! आपला १५० दिवसाचा आलेख चांगला आहे.असेच निर्णय घ्या.असेच निर्भिड,निर्मोही,निरपेक्ष आणी निडर रहा ! आपल्या अशा प्रत्येक कार्यात वाशिमकर आपल्या सोबत आहेत.

आपल्या तंदुरुस्त १५० दिवसांबद्दल आपले अभिनंदन !

**विद्यावाचस्पती**
**प्रा.दिलीप जोशी**
वाशिम
मो. ९८२२२६२७३५

**एक अकेला अनिल केंदळे क्या कर सकेगा ?**
१) एक अनिल केंदले भर उन्हाळयात पाण्याचे नियोजन करून पाणी टंचाईचे संकट घालवू शकतो.
२) एक अनिल केंदले अनेक वर्षापासून रखडलेले रस्ते चकाचक करण्याचा जीवतोड प्रयास करतो.
३) एक अनिल केंदले प्रतिक्षेत असलेले नाट्यगृह सुसज्ज करू शकतो.
४) अंधारातले वाशिम बऱ्यापैकी प्रकाशमय करू शकतो.
५) अस्वच्छ वाशिमला स्वच्छतेकडे नेवू शकतो.
६) कचरा व्यवस्थापनावर जातीने लक्ष घालतोय.
७) बारा पंधरा तास फक्त वाशिमसाठी देतोय.
८)ज्ञानशक्ती ,ईच्छाशक्ती आणी क्रियाशक्तीचा वापर करून वाशिमला सर्वांगसुंदर करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करतोय.

**मी साक्षी भावाने त्यांचे अवलोकन करीत आहे.त्यांचा कामाचा झपाटा आणी सपाटा पाहता**
१)त्यांच्यावर कोणाचा दबाव येवू शकत नाही
२)त्यांच्यावर जबरदस्ती कोणी करू शकत नाही
३)कोणी व्यक्तीगत स्वार्थासाठी वाशीमला वेठीस धरत असेल तर कठोर भूमिका घेतात.
४)जे जनहिताचे आणी जनमताचे तेच ते करतात.
५)दिसायला मृदुनी कुसुमादपी वाटणारे केंदले साहेब वङ्कादपी कठोरानी देखिल होऊ शकतात याचा प्रत्यय वाशिमकरांना येतांना दिसतो.
....................
**केंदले साहेब ! आपल्या समन्वय कौशल्याचेही कौतुक.असो.**
**लोकमताचा धांडोळा घेतला तर**
१)यंदाच्या उन्हाळयात नळाचे पाणी नियोजन उत्तम होते.
२)ज्या रस्त्यांसाठी ओरड होती ते रस्ते सुरू झालेत.
३)नाले,नाल्या सफाई,कचरा व्यवस्थापन समाधानकारक आहे.
४)नगराध्यक्ष दस्तूरखुद्द उन्हातान्हाची पर्वा न करता रस्त्यावर उतरून आढावा घेतांना दिसताहेत.
४)लोकभावनांचा आदर होतोय.
५) मुख्य म्हणजे नगराध्यक्ष कोणत्याच चांडाळचौकडीत अडकलेले दिसत नाहीत.माझ्या दृष्टीने श्री.अनिल केंदले यांना याबद्दल शाबासकी !

## दिन विशेष

# चतुरस्त्र अभिनयाने प्रेक्षकांना मोहिनी घालणारी अभिनेत्री नुतन



आज जयंती

नूतन (माहेरचे आडनाव समर्थ/सेन, सासरचे बेहल) यांचा जन्म ४ जून १९३६ रोजी झाला. त्या प्रामुख्याने हिंदी चित्रपटांमध्ये काम करणाऱ्या एक भारतीय चित्रपट अभिनेत्री होत्या. सुमारे चार दशकांच्या कारकिर्दीत त्यांनी ८० हून अधिक चित्रपटांमध्ये काम केले. ज्यात रोमान्सपासून सामाजिक-वास्तववादी नाट्य चित्रपटांपर्यंतचे प्रकार आहेत. भारतीय चित्रपटसृष्टीच्या इतिहासातील सर्वोत्कृष्ट अभिनेत्यांपैकी एक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नूतनला अनेकदा अपारंपरिक समजल्या जाणाऱ्या संघर्षग्रस्त स्त्रियांच्या पात्रांमध्ये तिच्या नैसर्गिक अभिनय शैलीसाठी ओळख मिळाली होती. तिच्या पुरस्कारांमध्ये सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीसाठी विक्रमी पाच फिल्मफेअर पुरस्कारांचा समावेश आहे. १९७४ मध्ये नूतन यांना पद्मश्री हा भारताचा चौथा सर्वोच्च नागरी पुरस्कार मिळाला.

चित्रपट निर्माते कुमारसेन समर्थ आणि चित्रपट अभिनेत्री शोभना समर्थ यांच्या पोटी मुंबईत जन्मलेल्या नूतनने वयाच्या १४ व्या वर्षी तिच्या आईने दिग्दर्शित हमारी बेटी या चित्रपटातून आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली. त्यानंतर तिने नगीना (१९५१) आणि हम लोग (१९५१) चित्रपटांमध्ये काम केले. सीमा (१९५५) मधील तिच्या भूमिकेने तिला व्यापक मान्यता मिळवून दिली आणि तिला सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पहिला फिल्मफेअर पुरस्कार मिळाला. ती १९६० च्या दशकात व १९७० च्या दशकाच्या उत्तरार्धापर्यंत प्रमुख भूमिका बजावत राहिली आणि सुजाता (१९५९), बंदिनी (१९६३), मिलन (१९६७) आणि मैं तुलसी तेरे आंगन की (१९७८) मधील भूमिकांसाठी तिने इतर चार प्रसंगी फिल्मफेअर पुरस्कार जिंकले. या काळातील तिच्या इतर काही चित्रपटांमध्ये अनाडी (१९५९), छलिया (१९६०), तेरे घर के सामने (१९६३), खानदान (१९६५), सरस्वतीचंद्र (१९६८), अनुराग (१९७२) आणि सौदागर (१९७३) यांचा समावेश होतो.

१९८० च्या दशकात, नूतनने व्यक्तिरेखात्मक पात्र साकारण्यास सुरुवात केली आणि तिच्या मृत्यूच्या काही काळापूर्वीपर्यंत ती काम करत राहिली. साजन की सहेली (१९८१), मेरी जंग (१९८५) आणि नाम (१९८६) यांसारख्या चित्रपटांमध्ये तिने मुख्यतः आईच्या भूमिका साकारल्या. मेरी जंग मधील तिच्या अभिनयामुळे तिला सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्री श्रेणीत सहावा आणि अंतिम फिल्मफेअर पुरस्कार मिळाला. नूतन यांनी नौदल लेफ्टनंट-कमांडर रजनीश बहल यांच्याशी १९५९ मध्ये विवाह केला होता. १९९१ मध्ये स्तनाच्या कर्करोगाने तिचा मृत्यू झाला. त्यांचा एकुलता एक मुलगा मोहनीश बहल हा अभिनेता आहे.

१९४५ मध्ये तिच्या वडिलांच्या नल दमयंती या चित्रपटात नूतन पहिल्यांदा लहानपणी कॅमेऱ्यासमोर दिसली. वयाच्या १४ व्या वर्षी तिची आई दिग्दर्शित हमारी बेटी (१९५०) मध्ये नायिकेची भूमिका करून तिच्या कारकिर्दीला सुरुवात केली. त्यानंतर रवींद्र दवे यांचा सस्पेन्स थ्रिलर चित्रपट नगीना (१९५१) आला आणि या चित्रपटातील नूतनच्या अभिनयाने तिला अधिक ओळख मिळाली. हा चित्रपट तिचा पहिला व्यावसायिक यश ठरला. त्याच वर्षी प्रदर्शित झालेला सामाजिक नाट्य चित्रपट हम लोग होता ज्यामुळे प्रेक्षकांमध्ये ती लोकप्रिय झाली. नगीना आणि हम लोग यांनी एक उगवता तारा म्हणून तिचे स्थान मजबूत केले.

# भारतातील एकमेव महिला विद्यापीठ श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी

श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ (एसएनडीटी विद्यापीठ) हे भारतातील एक महिला विद्यापीठ आहे. याची स्थापना महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी केली. हे भारतातील पहिले महिला विद्यापीठ आहे. एसएनडीटीची स्थापना पुण्यातली असली तरी त्याचे स्थलांतर मुंबईस होऊन तिथेच खऱ्या विस्ताराला सुरुवात झाली. या विद्यापीठाशी संबंधित सगळी महाविद्यालये एसएनडीटी कॉलेज म्हणून ओळखली जाऊ लागली.




डिसेंबर, इ.स. १९१५ साली धोंडो केशव कर्वे यांनी इंडियन सोशल कॉंग्रेसच्या (भारतीय सामाजिक परिषद) अध्यक्षीय भाषणातून महिला विद्यापीठाची कल्पना सर्वप्रथम मांडली. ३ जून, इ.स. १९१६ रोजी विद्यापीठाची औपचारिक स्थापना झाली. पाच विद्यार्थिनींचा पहिला वर्ग ५ जुलै, इ.स. १९१६ रोजी सुरू होऊन विद्यापीठाच्या कामाला आरंभ झाला. इ.स. १९१६ साली या विद्यापीठाची स्थापना भारतवर्षीय महिला विद्यापीठ (इंडियन विमेन्स युनिव्हर्सिटी) या नावाने झाली. सर विठ्ठलदास ठाकरसींनी या विद्यापीठाला १५ लाख रुपयांची देणगी दिल्यानंतर विद्यापीठाला त्यांच्या आईचे नाव देण्यात आले. १९२० साली विद्यापीठाचे नाव 'श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ' असे झाले. विद्यापीठातर्फे सुरुवातीला जी.ए. (गृहीतागमा) आणि पी.ए. (प्रदेयागमा) अशा दोन पदव्या दिल्या जात असत. इ.स. १९५१ साली या विद्यापीठाला महाराष्ट्र सरकारची मान्यता मिळाली. इ.स. १९९४ च्या महाराष्ट्र विद्यापीठ कायद्यात एक वेगळे कलम (क्रमांक १०५) केवळ श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठासाठी आहे. या विद्यापीठास महाराष्ट्रात तसेच इतर कोणत्याही राज्यात आणि केंद्रशासित प्रदेशात महाविद्यालये संलग्नित करता येतात. इ.स. १९५२ ते १९५७ या कालावधीत दिवाणबहादुर झवेरी यांनी कुलगुरुपद सांभाळले व यानंतर मात्र एक तप (१९५७ ते १९६९) लेडी ठाकरसींनी. या शेवटच्या बारा वर्षांत १३ नवीन विभागांची/महाविद्यालयांची स्थापना झाली. यात मराठी, चित्रकला हे विभाग मुंबई व पुणे येथे, तसेच नर्सिंग महाविद्यालय, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, गृहविज्ञान महाविद्यालय ही महत्त्वाची महाविद्यालये होती. अर्थशास्त्र, शिक्षणशास्त्र, ग्रंथपालनशास्त्र, फूड सायन्स अँड न्युट्रिशन अशा पदव्युत्तर विभागांचा समावेशही होता. १९७१ ते १९७५ या काळात आणखी ११ विभागांची भर पडली आणि शिवाय पुण्यात एक शिक्षणशास्त्र महाविद्यालय ही स्थापन झाले. भारतातील विद्यापीठात अन्यत्र न दिसणारे महिला विद्यापीठाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे येथील शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील अनेक विभाग आहेत. दोन शिक्षणशास्त्र विभाग, स्पेशल एज्युकेशन, शैक्षणिक तंत्रविज्ञान, मार्गदर्शन आणि समुपदेशन, शैक्षणिक व्यवस्थापन, भाषा अध्यापन, तसेच विद्यापीठ संचालित दोन शिक्षणशास्त्र महाविद्यालये सुद्धा आहेत.

**कर्वेंनी दूरसि शिक्षणाचा केला होता विचार**
कर्वे यांनी दूरस्थ शिक्षणाचा हा विचार विद्यापीठाच्या स्थापनेपासूनच केला होता. सुप्रसिद्ध अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांच्या मातोश्री दिवंगत कमलाताई काकोडकर आणि अशा अनेक स्त्रियांनी स्वतःचे घर, संसार, नोकरी, उद्योग सांभाळून दूरस्थ शिक्षण पद्धतीने उच्च शिक्षण घेतले. एम.कॉम. हा ८० क्रेडिटचा अभ्यासक्रम पूर्णतः ऑनलाइन प्रणालीने शिकवला जातो. आता ऑगस्ट २०१५ पासून एम.ए. इन एज्युकेशन हा अभ्यासक्रमही पूर्णतः ऑनलाइन करण्यात आला होता.

## साहित्यिक, लेखकांना आवाहन

**दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट** आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर **८३९०६७०९९९** या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा.
त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल. या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

गुरुवार, दि. ४ जून २०२६

http://epaper.citynewssuperfast.com

# गुटख्याची विक्री, वाहतूक करणाऱ्या सोबतच आता कंपनी मालकावर होईल कारवाई

प्रतिनिधी ४ जून

## ♦ अन्न व औषध विभागाच्या आयुक्तांचे निर्देश



**अकोला :** राज्यात गुटखा बंदी असताना सुद्धा सर्रासपणे सर्वत्र गुटखा मिळतो गुटख्यावर कारवाईचे आदेश आदेश असल्यावरही गुटख्याची विक्री थांबलेली नाही गुटखा विक्री करणाऱ्या टोळ्या जिल्ह्यात सक्रिय असून परराज्यातून गुटखा आणून जिल्ह्यात विक्री केली जात आहे. परंतु आता अवैध गुटखा विक्रेत्यांच्या मुस्क्या आवडण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांनी धडाकेबाज निर्णय घेतला आहे गुटक्यावर कारवाई करताना थेट कंपनी मालकाविरोधात गुन्हे दाखल करून त्यांना आरोपी करा असे स्पष्ट आदेश अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांनी दिले असल्याची माहिती आहे यापूर्वी केवळ गुटख्याची वाहतूक तसेच विक्री करणाऱ्या विरोधात कारवाई होत होती मात्र आता गुटखा कंपनीच्या मालकावर कारवाई केली जाणार आहे अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्त पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर मुंडे यांनी राज्यात धडाकेबाज कारवाया सुरू केल्या आहेत आता राज्यातील गुटखा व पान मसाल्यावर कारवाई करण्याचा त्यांनी आदेश दिला आहे त्यांच्या आदेशानुसार राज्यात ठीक ठिकाणी छापे टाकून गुटखा जप्त करण्यात येत आहे राज्यात गुटखा विक्रीस बंदी आहे असे असताना कर्नाटक गुजरात तसेच मध्यप्रदेशातून गुटका महाराष्ट्रात विक्रीसाठी आणला जातो बुटक्याची वाहतूक करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात येतात मात्र मूळ मालकांवर कारवाई होत नाही

### अकोला शहरात गुटख्याची मोठ्या प्रमाणात विक्री

अकोला शहरात तसेच जिल्ह्यातही गुटख्याची सर्रास विक्री होत आहे विविध कंपन्यांचा गुटखा सर्वत्र उपलब्ध आहे अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी गुटखा विकत्यांवर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत मात्र शहरातील अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी ढिम्म भूमिका घेतली आहे. गुटखा तर सोडा साध्या फळ विक्रेत्यांवर सुद्धा कारवाई केली जात नाही. अन्न व औषध विभागाच्या आयुक्तांनी आदेश दिल्यानंतरही शहरात गुटख्याची विक्री थांबलेली नाही गुटखा विक्री करणाऱ्या टोळया जिल्ह्यात सक्रिय असून पर राज्यातून गुटखा आणून ग्रामीण भागात तसेच शहरात विक्री केली जात आहे

कारवाईदरम्यान जप्त केलेल्या गुटक्यावर कंपनीचे नाव व पत्ता ही असतो परंतु त्या दिशेने तपास होत नाही फक्त वाहतूक करणाऱ्यांवरच कारवाई होते आता थेट गुटक्याच्या कंपनी मालकाविरोधात गुन्हे दाखल करण्यात येणार असून गुटकाबंदीची कड़क अंमलबजावणी केली जाणार आहे शहरात तसेच जिल्ह्यात अनेकदा पोलिसांनी छापा टाकत गुटखयाचा माल पकडला आहे. विक्री करणाऱ्यांना तसेच वाहतूक करणाऱ्यांना अटक सुद्धा करण्यात आली आहे मात्र हा गुटखा कुठून आला कोणत्या कंपनीत तयार झाला याचा शोध घेण्याची तसदी पोलिसांनी घेतली नाही यापुढे गुन्हा दाखल करताना कंपनीच्या नावाचा उल्लेख केला जाणार असून कंपनी मालकांना आरोपी केले जाणार आहे.

# कृषी विभागाची धडक कारवाई

प्रतिनिधी ४ जून

## ♦ ७ कृषी सेवा केंद्रांचे परवाने कायमस्वरूपी रद्द, ३ निलंबित

**अकोला :** खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांची फसवणूक टाळण्यासाठी कृषी विभागाने जिल्ह्यात कृषि निविष्ठा विक्रीत अनियमितता आढळल्याने जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी मोठी कार्यवाही केली असून तपासणी आणि सुनावणीअंती ७ कृषी सेवा केंद्रांचे परवाने कायमस्वरूपी रद्द करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे, ३ केंद्रांचे परवाने १ ते २ महिन्याकरिता निलंबित करण्यात आले आहेत. तर इतर ६ केंद्रांना त्रुटीं बाबत सक्त ताकीद देण्यात आली आहे. या कारवाईमुळे नियमबाह्य व्यवसाय करणाऱ्या केंद्रचालकांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

**या कृषी केंद्रांवर झाली कठोर कारवाई**

तपासणी व सुनावणी दरम्यान समाधानकारक खुलासा, स्पष्टीकरण न देऊ शकल्याने अकोट तालुक्यातील बोर्डी येथील राय कृषी सेवा केंद्र, अकोली जहाँगीर येथील मोहन ट्रेडर्स, तेल्हारा तालुक्यातील तळेगाव बु. येथील महालक्ष्मी कृषी सेवा केंद्र, पातूर तालुक्यातील सस्ती येथील शिवशक्ती ?ग्रोटेक, पातूर येथील खानापूर रस्त्यावरील शेतकरी कृषी सेवा केंद्र, वाडेगाव येथील बळीराजा कृषी सेवा केंद्र आणि बादलापूर येथील जगदंब अॅग्रो एजन्सीज व अॅग्रोटेक या सात केंद्रांचे परवाने कायमस्वरूपी रद्द करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे, बाळापूर तालुक्यातील निंबा फाटा येथील आपलं ग्रोमर कृषी सेवा केंद्र यांचे एका महिन्यासाठी, तेल्हारा तालुक्यातील वारखेड येथील शेतकरीपुत्र कृषी सेवा केंद्राचे दोन महिन्यासाठी व कापशी रोड येथील मातोश्री कृषी सेवा केंद्राचे एका महिन्यासाठी परवाना निलंबन करण्यात आले आहे.

कृषी अधिकारी (गुणनियंत्रण) तालुका कृषि अधिकारी कार्यालय व कृषी अधिकारी, पंचायत समिती यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील विविध कृषी केंद्रांची अचानक तपासणी केली होती. या मोहिमेत एकूण १६ कृषी केंद्रांमध्ये गंभीर व नियमबाह्य बाबी आढळून आल्या. 'इ-पॉस' (I-इदए) मशीनमधील अधिकृत साठा आणि प्रत्यक्ष दुकानात उपलब्ध असलेला साठा यात मोठी तफावत आढळली. दुकानात साठा फलक आणि चालू दर फलक अद्ययावत ठेवले नव्हते. तसेच, शेतकऱ्यांना अधिकृत 'पक्की बिले' न देणे किंवा दिलेली बिले विहित नमुन्यात नसणे, केंद्राचे अधिकृत परवाना/नोंदणी प्रमाणपत्र ग्राहकांना दिसेल अशा ठिकाणी न लावणे या त्रुटींच्या अनुषंगाने जिल्हा स्तरावर घेण्यात आलेल्या सुनावणीत उचित खुलासा उत्तर न मिळाल्याने ही कडक कारवाई करण्यात आली. कृषी विभागाने दिलेल्या माहितीनुसार, जिल्ह्यात खरीप हंगामासाठी पुरेसा खत आणि बियाणे साठा उपलब्ध आहे. मात्र, फसवणूक टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी खरेदी करताना खालील गोष्टींची काळजी घ्यावी. खरेदी केल्यानंतर विक्रेत्याकडून विहित नमुन्यातील पक्के बिल आवर्जून मागावे. बिलावर लॉट नंबर, बॅच नंबर आणि योग्य किंमत लिहिलेली आहे का, याची शहानिशा करा. नेहमी नामांकित आणि नोंदणीकृत कंपन्यांच्याच कृषी निविष्ठांना प्राधान्य द्यावे.

**तक्रार कोठे करावी?**

♦ जर कोणत्याही कृषी केंद्रचालकाने बियाणे किंवा खतांचा काळाबाजार केला, जादा दराने विक्री केली किंवा पक्के बिल देण्यास नकार दिला, तर शेतकऱ्यांनी त्वरित आपल्या तालुक्यातील पंचायत समिती किंवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयातील 'तक्रार निवारण कक्षात' संपर्क साधावा, लेखी तक्रार करावी असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी केले आहे.

# समृद्धी महामार्गावर शेलू बाजार ते मालेगाव जवळ संजय ट्रॅव्हल्सची ट्रकला धडक, 15 प्रवासी जखमी

प्रतिनिधी ४ जून



**वाशिम :** वाशिमच्या समृद्धी महामार्गावर शेलू बाजार ते मालेगाव दरम्यान आज पहाटे एका लक्झरी ट्रॅव्हल्सने समोरील ट्रकला धडक दिल्यामुळे भीषण अपघात झाल्याची घटना घडली.या अपघातात ट्रॅव्हल्स मधील १५ प्रवासी जखमी झाले असून चार जणांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती आहे.वाशीम जिल्ह्यातील समृद्धी महामार्गावरून संजय ट्रॅव्हल्स कंपनीची बस नागपूरहून पुण्याकडे जात होती.दरम्यान आज पहाटे २ ते ३ च्या सुमारास मालेगाव ते शेलुबाजार जवळ असलेल्या कवरदरी येथे या लक्झरी ट्रॅव्हल्सने समोरील एका ट्रकला जोरदार धडक दिली.या भिषण अपघातात ट्रॅव्हल्स मधील १५ प्रवासी जखमी झाले असून चालक आणि क्लिनरसह दोन प्रशांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती समोर आली. घटनेची माहिती मिळताच महामार्ग पोलीस, बचाव पथक व आपत्कालीन सेवा घटनास्थळी दाखल झाले.जखमींना तातडीने वाशीम आणि अकोला येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्या उपचार सुरू आहे.चालकाचे बसवरील नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाल्याची प्राथमिक माहिती आहे.

# वादळ वाऱ्यामुळे केळी उत्पादकांचे नुकसान

प्रतिनिधी ४ जून

## ♦ शासनाकडे मदतीची मागणी



**बाळापूर :** अचानक आलेल्या सोसाट्याच्या वाऱ्याने केळी उत्पादक शेतकऱ्यांचे लाखोचे नुकसान झाले. १ जून रोजी संध्याकाळी वादळी वारा केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या मेहनतीवर पाणी फिरवणारा ठरला. पीक काही दिवसातच काढणीला येणार होते.

पण वादळ वाऱ्याचा केळीच्या संपूर्ण पिकाला जबरदस्त फटका बसला. यामुळे बाळापुर तालुक्यासह जिल्ह्यातील केळी उत्पादक शेतकरी हा निसर्गाच्या या लहरीपणाला बळी पडला आहे. शासनाने काही प्रमाणात बुडत्याला काठीचा आधार याप्रमाणे लवकरात लवकर मदत जाहीर करावी व या अडचणीच्या काळात शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे हीच आशा केळी उत्पादक शेतकरी मनाशी बाळगून आहेत. एक निवेदन बाळापुर तालुक्यातील केळी उत्पादक शेतकऱ्यांनी तहसीलदार वैभव फरताळे यांना देण्यात आले. जिल्ह्यातील केळी उत्पादक शेतकऱ्यांना या पिकासाठी पिक विमा लागू करून शासकीय संरक्षण मिळावे अशी अपेक्षा केली.

# शासकीय कार्यालयातील वॉटर कुलर रिकामे

प्रतिनिधी ४ जून

## ♦ महिला व बालकल्याण विभागातील प्रकार

**अकोला :** शहरातील संतोषी माता मंदिर जवळील महिला व बाल कल्याण विभाग कार्यालयात पिण्याचे पाणी उपलब्ध नसल्याने या ठिकाणी येणाऱ्या नागरिकांना पाण्याच्या शोधात वनवन भटकावे लागत आहे. महिला व बालकल्याण दोन वॉटर कुलर बसविण्यात आले, परंतु दोन्ही वॉटर कुलर मध्ये पिण्याचे पाणी उपलब्ध नाही. त्यामुळे या कार्यालयात येणारे नागरिक चांगलेच वैतागले आहेत. गेल्या काही दिवसांपासून महिला व बालकल्याण विभाग कार्यालयात लाडकी बहीण योजनेच्या कामासाठी महिला आपल्या मुलांसह कार्यालयात तासंतास बसून राहतात, या ठिकाणी येणाऱ्या महिलांना पिण्याचे पाणी उपलब्ध नसल्याने त्यांना चांगलाच त्रास सहन करावा लागत आहे. एकीकडे या कार्यालयात कामकाज करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी पाण्याची कॅन ची व्यवस्था करण्यात आली आहे, तर दुसरीकडे कामकाजाकरता येणारे नागरिक तसेच तहानलेले दिसून येत आहेत. या ठिकाणी पिण्याच्या पाण्याबातच्या व्यवस्थेबाबत अधिकाऱ्यांशी चर्चा केली असता या कार्यालयातील पाणीपुरवठा करणारी सबमर्सिबल बोअर काम करीत नसल्याने पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण झाल्याचे त्यांनी सांगितले. नागरिकांसाठी पर्यायी व्यवस्था म्हणून कार्यालयाकडून नागरिकांकरता पाण्याची त्यांची व्यवस्था करीत असल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

# पुनर्वसनाशिवाय धरणाचे काम नाही !

## ♦ संतप्त रोहणखेडा-पर्वतापूर ग्रामस्थांनी धरणाचे काम पाडले बंद

प्रतिनिधी ४ जून

**अमरावती :** पेढी बॅरेजसाठी तब्बल ८५० एकर जमीन देऊन विस्थापित झालेल्या रोहणखेडा-पर्वतापूर येथील नागरिकांचा संयम अखेर सुटला असून पुनर्वसनाच्या मागणीसाठी त्यांनी थेट धरणाच्या कामावरच ब्रेक लावला आहे. 'आधी पुनर्वसन, मग धरणाचे काम' अशी ठाम भूमिका घेत संतप्त ग्रामस्थांनी पुनर्वसन स्थळी सुरू असलेले धरणाचे काम बंद पाडत प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली. गेल्या अनेक वर्षांपासून पुनर्वसनाच्या प्रश्नावर प्रशासनाकडून केवळ आश्वासने दिली जात असून प्रत्यक्षात कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. मौजे रामगाव येथील गट क्रमांक ४३ ची जमीन संपादित होऊन हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण झाली असताना गट क्रमांक ११९ च्या संपादनाबाबत मात्र जाणीवपूर्वक अडथळे निर्माण केले जात असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे. २ जून रोजी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) यांना निवेदन देऊनही प्रशासनाने कोणतीही सकारात्मक भूमिका न घेतल्याने संतप्त नागरिकांनी आंदोलनाचा मार्ग स्वीकारला. धरणासाठी जमीन दिल्यानंतर शेती, रोजगार आणिउदरनिर्वाहाची साधने हिरावली गेली असून अनेक कुटुंबांवर उपासमारीची वेळ आल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. 'प्रशासनाला धरणाचे काम महत्त्वाचे वाटतेः मात्र ज्यांच्या जमिनी गेल्या त्या विस्थापितांच्या पुनर्वसनाचा प्रश्न दुर्लक्षित केला जात आहे.

# आमदार हरीश पिंपळे यांनी लक्ष्मीबाई देशमुख उपजिल्हा रुग्णालयाची केली पाहणी

प्रतिनिधी ४ जून



**मुर्तिजापूर :** श्रीमती लक्ष्मीबाई देशमुख उपजिल्हा रुग्णालयाला आमदार हरीश पिंपळे यांनी भेट देऊन विविध विभागांची सविस्तर पाहणी केली. रुग्णालयातील आरोग्य सेवा, स्वच्छता व रुग्णांना दिल्या जाणाऱ्या सुविधांचा त्यांनी प्रत्यक्ष आढावा घेतला. यावेळी आमदार पिंपळे यांनी एक्स-रे विभाग, ईसीजी विभाग, लसीकरण कक्ष, रुग्ण वॉर्ड तसेच स्वयंपाकगृहाची पाहणी करून रुग्णांना मिळणाऱ्या सेवांची माहिती घेतली. रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. प्रत्येक नागरिकाला सरकारी रुग्णालयात दर्जेदार उपचार, आवश्यक औषधे आणि उत्तम आरोग्य सुविधा वेळेवर उपलब्ध व्हाव्यात, यासाठी प्रशासनाने विशेष लक्ष द्यावे, अशा सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच रुग्णालय परिसरातील स्वच्छता आणि व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यावर भर देण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले.

या पाहणी दरम्यान नगराध्यक्ष हर्षल साबळे, भाजप तालुकाध्यक्ष नंदकिशोर राऊत, रुग्णसेवक सुनीलभाऊ लछुवाणी, नगरसेवक लखन मिलांदे, वैद्यकीय अधिकारी डॉ. राजेंद्र नेमाडे तसेच रुग्णालयातील कर्मचारी उपस्थित होते.

रुग्णांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचा विश्वास आमदार हरीश पिंपळे यांनी यावेळी व्यक्त केला.

# खामगावात चोरी; रोकड लंपास !

प्रतिनिधी ४ जून

**खामगाव :** शहरातील शिवाजीनगर परिसरात चोरट्यांनी भरदिवसा घरफोडी करत, तब्बल ५ लाख २० हजार रुपयांची रोकड लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी शिवाजीनगर पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. शिवाजीनगर जुना फैल परिसरात राहणारे योगेश प्रभाकर केवारे (वय ४०) हे संगणक जॉबवर्कचा व्यवसाय करतात. १ जून रोजी सकाळी ११ वाजेपासून सायंकाळी ७ वाजेपर्यंत त्यांच्या घरात कोणी नसल्याची संधी साधून अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश केला. त्यानंतर घरातील लोखंडी कपाटाचे लॉकर उघडून त्यामध्ये ठेवलेली ५ लाख २० हजार रुपयांची रोकड घेऊन पोबारा केला. सायंकाळी घरी परतल्यानंतर ही चोरी उघडकीस आली. घटनेची खात्री झाल्यानंतर योगेश केवारे यांनी २ जून रोजी शिवाजीनगर पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. फिर्यादीवरून गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

आपणा सर्वांच्या आशीर्वादाने
आणि सहकार्याने आम्ही
तीर्थंकर सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलचा
(४ जून २००६ - ४ जून २०२६)
20
वा वर्धापन दिन साजरा करीत आहोत.
असाच स्नेह कायम असू द्यावा.
डॉ. प्रशांत मुळावकर
युरोलॉजिस्ट
डॉ. उत्पला मुळावकर
प्लास्टीक सर्जन
आणि समस्त कर्मचारीगण
तीर्थंकर सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल
चांडक मंगल कार्यालय जवळ, गड्डम प्लॉट, अकोला
Phone - 0724-2411437, 2425757 Mob. 9766123875, 8855943864

# अकोला शहरात अतिक्रमणविरोधात महापालिकेची धडक कारवाई

प्रतिनिधी ४ जून

## बसस्थानक, रतनलाल प्लॉट, जवाहर नगर परिसरातील अतिक्रमणे हटवली विदर्भ हॉस्पिटलसमोरील रस्ते मोकळे नागरिकांनी व्यक्त केले समाधान




**अकोला :** अकोला शहरातील वाढत्या अतिक्रमणाच्या समस्येवर अखेर प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला आहे. बसस्थानक परिसर, रतनलाल प्लॉट, जवाहर नगर तसेच विदर्भ हॉस्पिटलसमोरील मुख्य रस्त्यावर करण्यात आलेल्या अतिक्रमण हटाव मोहिमेत अनेक अनधिकृत बांधकामे, हातगाड्या आणि रस्त्यावरील अडथळे हटविण्यात आले. या कारवाईमुळे वाहतुकीला अडथळा ठरणारे अतिक्रमण दूर झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

अकोला शहरातील प्रमुख रस्ते आणि व्यापारी भागांमध्ये दिवसेंदिवस वाढत असलेल्या अतिक्रमणामुळे वाहतूक कोंडीची समस्या गंभीर बनत होती. याची दखल घेत प्रशासनाने विशेष अतिक्रमण हटाव मोहीम राबवत बसस्थानक परिसर, रतनलाल प्लॉट, जवाहर नगर आणि विदर्भ हॉस्पिटलसमोरील भागात धडक कारवाई केली. या कारवाईदरम्यान रस्त्यावर अडथळा निर्माण करणाऱ्या अनधिकृत हातगाड्या, फेरीवाले, तात्पुरती शेड्स तसेच इतर अतिक्रमणे हटविण्यात आली. प्रशासनाच्या पथकाने संबंधितांना पूर्वसूचना देत नियमानुसार कारवाई केल्याची माहिती मिळाली आहे. अतिक्रमणामुळे नागरिकांना तसेच रुग्णवाहिका आणि इतर आपत्कालीन वाहनांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. विशेषतः विदर्भ हॉस्पिटल परिसरात रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना वाहतुकीच्या समस्येमुळे त्रास सहन करावा लागत होता.या कारवाईनंतर संबंधित भागातील रस्ते मोकळे झाले असून वाहतुकीला दिलासा मिळाला आहे. अतिक्रमण पुन्हा होऊ नये यासाठी प्रशासनाने नियमित पाहणी करून आवश्यक ती कारवाई सुरू ठेवावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.शहरातील रस्ते अतिक्रमणमुक्त ठेवण्यासाठी नागरिकांनीही सहकार्य करावे आणि सार्वजनिक जागांवर अनधिकृत अतिक्रमण टाळावे, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# वाघ शिकार प्रकरणातील महिलेचा जामीन अर्ज फेटाळला

वि प्रतिनिधी ४ जून

**अकोट:** मेळघाट-अकोट वन्यजीव विभागाच्या हद्दीतील वाघ शिकारी प्रकरणातील महिला आरोपी गजेंद्रीबाई ऊर्फ शीतल रतन ऊर्फ टेरालिन पारधी (रा. देवरी, मध्य प्रदेश) हिचा जामीन अर्ज अकोट येथील अतिरिक्त जिल्हा व विशेष सत्र न्यायाधीश बी. एम. पाटील यांनी फेटाळला. खिरकुंड वनक्षेत्रात ६ ऑगस्ट २०१३ रोजी वाघाची शिकार करून त्याची कातडी व हाडे विकल्याप्रकरणी वन्यजीव संरक्षण अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल आहे. या प्रकरणात आरोपीला मध्य प्रदेशातील मंडला कारागृहातून प्रॉडक्शन वॉरंटद्वारे ताब्यात घेण्यात आले होते. सरकार पक्षातर्फे अॅड. अजित देशमुख यांनी युक्तिवाद करताना या प्रकरणातील इतर आरोपींना यापूर्वी शिक्षा झाल्याचे तसेच गजेंद्रीबाई २०१२ पासून फरार असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. तिच्याविरुद्ध अन्य वन्यजीव शिकारीचे गुन्हेही दाखल असल्याचा दावा करण्यात आला. यानंतर न्यायालयाने जामीन अर्ज फेटाळण्याचा आदेश दिला.

४ सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

गुरूवार दि ४ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

राजकीय ॲक्टर,
स्त्रीभ्रूणहत्येचा फॅक्टर,
अविवेकी डॉक्टर,
बोगस कॅरेक्टर...




## आरोपी ज्ञात, दाखविला अज्ञात... कारवाई न करण्याचा करार,



# अज्ञाताविरूध्द तक्रार, आरोपी फरार!

●सिटी न्युज ब्युरो @वाशीम●

* अविवेकी डॉक्टरच्या डॉक्टर पत्नीच्या नावाची परिसरात चर्चा
* मालेगाव येथील बेकायदेशिर स्त्रीभ्रूण हत्या प्रकरण
* पोलिस व आरोग्य विभागाच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह

**मालेगाव येथील आरोग्य विभागाच्या वैद्यकीय अधीक्षकांनी राजाश्रय असलेल्या सत्ताधारी पक्षाच्या 'निष्ठा' वान कार्यकर्ता असलेल्या अविवेकी डॉक्टरच्या बेकायदेशीररित्या गर्भ लिंग निदान चाचणीसह स्त्री भ्रूण हत्या करणाऱ्या कथित सोनोग्राफी सेंटर वर 'सिंघम' स्टाईल धाडसी कारवाई करून अविवेकी दाम्पत्याचे काळे कारनामे उघडकीस आणून स्वतःची पाठ थोपटून घेतली आहे. परंतु ही धडाकेबाज कारवाई करतांना अविवेकी डॉक्टरच्या डॉक्टर असलेल्या आणि अविवेकी डॉक्टरच्या प्रत्येक पापात सहभागी असलेल्या 'पुरोगामी' पत्नीचे नाव 'ज्ञात' असूनही तक्रार देतांना 'अज्ञात' महिला डॉक्टर असा उल्लेख केल्याने आरोग्य व पोलीस प्रशासनाच्या कार्यप्रणालीबाबत परिसरात उलटसुलट चर्चेला उधाण आले आहे.**




दोन आठवड्यापुर्वी मालेगाव नगरीत जगजाहीर झालेल्या अविवेकी डॉक्टरच्या माने हॉस्पीटल मध्ये खुलेआम सुरू असलेल्या बेकायदेशीर गर्भ लिंग निदान चाचणीसह स्त्री भ्रूण हत्या करणाऱ्या सोनोग्राफी सेंटरवर बोगस गर्भवती असलेल्या महिलेस पाठवून आरोग्य विभागाने टाकलेल्या कारवाईत माने दाम्पत्यासह काही दलालांची नावे समोर आलीत. आरोग्य विभागाचे वैद्यकीय अधीक्षक व त्यांची टीम ही धडाकेबाज कारवाई करण्यासाठी माने हॉस्पीटल मध्ये गेले असता त्यांनी समोरच्या दरवाजाने प्रवेश केला. माने दाम्पत्यावर कारवाईची 'विज' कोसळणार असल्याची चाहूल लागताच 'या' बेकायदेशीर कृत्यात सहभागी असलेले सर्व 'ज्ञात' आरोपी मागील दरवाजाने फरार झाल्याची चर्चा आहे. या काळ्या कृत्यात सदैव सहभागी असलेल्या अविवेकी डॉक्टरच्या 'पुरोगामी' विचाराच्या डॉक्टर असलेल्या पत्नीचे नाव सर्वांना ज्ञात असताना या प्रकरणात अज्ञात महिला डॉक्टर असा जाणूनबुजून उल्लेख केल्याची परिसरात चर्चा आहे. आता या प्रकरणाचा सखोल तपास करण्यासाठी मालेगाव पोलीस असमर्थ असतील तर पोलीस अधीक्षकांनी समर्थ असलेल्या एलसीबी कडे तपास सुपूर्द करून या महापापात सहभागी असलेल्या सर्व आरोपींना गजाआड करण्यासाठी पुढाकार घेण्याची मागणी विविध स्तरातून केल्या जात आहे.

### जिल्ह्यातील विविध महिला संघटनांचे मौनव्रत

दोन आठवड्यापूर्वी मालेगाव नगरीत उघडकीस आलेला स्त्री भ्रूण हत्येचे प्रकरण गाजत आहे. एरव्ही कोणत्याही शुल्लक कारणावरुन 'आवाज' उठविणाऱ्या विविध पक्षाच्या आणि स्वयंसेवी संस्थेच्या महिला सक्षमीकरणाच्या गाजावाजा करणाऱ्या महिला संघटनांनी माने दाम्पत्याच्या बेकायदेशीर स्त्री भ्रूण हत्येच्या प्रकरणात 'मौनव्रत' धारण केल्याचीही पंचक्रोशीत चर्चा आहे.

## थोडक्यात

### संभाजी ब्रिगेडच्या तालुकाध्यक्षपदी ॲड.अजय गवारगुरु यांची फेरनिवड



●सिटी न्युज ब्युरो @मंगरूळपीर●

संभाजी ब्रिगेड, मंगरूळपीरच्या तालुकाध्यक्षपदी ॲड.अजय गवारगुरु यांची पुन्हा एकदा फेरनिवड करण्यात आली आहे. त्यांच्या सामाजिक, संघटनात्मक व पक्षासाठी केलेल्या सातत्यपूर्ण कार्याची दखल घेत तसेच समाजहिताच्या विविध उपक्रमांमध्ये दिलेल्या योगदानाच्या पार्श्वभूमीवर ही निवड करण्यात आली आहे. वाशिम येथील स्थानिक विश्रामगृह येथे दि. ३१ मे रोजी पार पडलेल्या कार्यकर्ता प्रवेश सोहळ्यात संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष ॲड.मनोजदादा आखरे व जिल्हाध्यक्ष गजाननदादा भोयर यांच्या हस्ते तसेच इतर पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत नियुक्तीपत्र देऊन ही निवड करण्यात आली.

या निवडीमुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून आगामी काळात पक्ष, संघटना अधिक बळकट करण्यासाठी आणि सामाजिक प्रश्नांवर प्रभावीपणे काम करण्यासाठी ॲड. गवारगुरु प्रयत्नशील राहतील, असा विश्वास पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

### 'दामिनी' ॲप देणार वीज पडण्याची पूर्वसूचना

**वाशीम :** मान्सून कालावधीत, विशेषतः जून व जुलै महिन्यांदरम्यान वीज पडण्याच्या घटना वाढत असून, दरवर्षी यामुळे जीवित व वित्तीय हानी होत असल्याचे निदर्शनास येते. या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या सुरक्षेसाठी पृथ्वी विज्ञान मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या वतीने 'दामिनी' (Damini Lightning Alert) हे मोबाईल ॲप विकसित करण्यात आले आहे.

या ॲपच्या माध्यमातून वीज पडण्याच्या संभाव्य घटनांची पूर्वसूचना सुमारे १५ मिनिटे आधी नागरिकांना प्राप्त होते. हे ॲप जीपीएस प्रणालीवर आधारित असून, वापरकर्त्याच्या सद्यस्थितीनुसार आसपासच्या परिसरातील विजेची हालचाल आणि संभाव्य धोका दर्शविते.

## ग्रामसेवक पैशासाठी लाचार, कामे न करता भ्रष्टाचार!

●प्रभाकर नाईकवाडे @रिसोड●



मंगळवार दि २ जून २०२६ सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम वाशीम Express

अंचळ येथील कामाची देयके आधी, भ्रष्टाचाराचा विधी, गायब निधी...

भ्रष्टाचाराची चतुःसुत्री, कामे कागदोपत्री!

म्हणे सिईओच भ्रष्टाचारात साथी, चौकशी समिती आमच्या हाती



बुधवार दि ३ जून २०२६ सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम वाशीम Express

अंचळ येथील कामाची देयके आधी, भ्रष्टाचाराचा विधी, गायब निधी...

ग्रामसेवकांचा प्रताप भारी, एमबी नुसार व्हाचर दाखवा एकतरी!

* व्हाउचरमध्ये विकास दिसतो, पण गावात शोधावा लागतो *म्हणे सीईओ हाताशी; मग भीती कशाचा

अंचळ केवळ सुरुवात... आता केनवड परिसरातील गावागावांचा सिटी न्यूज सुपरफास्ट हिशोब बाहेर आणणार

अंचळ ग्रामपंचायतीतील विविध विकासकामे, व्हाउचर आणि ई-ग्रामस्वराज पोर्टलवरील खर्चाच्या नोंदींमुळे निर्माण झालेली चर्चा आता केवळ एका गावापुरती मर्यादित राहिलेली नाही. अंचळप्रमाणेच संबंधित ग्रामसेवकांकडे असलेल्या केनवडसह इतर ग्रामपंचायतींमध्येही असाच काही प्रकार घडला आहे का, याबाबत नागरिकांमध्ये चर्चा सुरू झाली असून, सिटी न्यूज सुपरफास्टने यासंदर्भात पुरावे गोळा करण्यास सुरुवात केली आहे.

अंचळ प्रकरणानंतर केनवड परिसरातील विविध ग्रामपंचायतींमधील १४ वा वित्त आयोग, १५ वा वित्त आयोग तसेच इतर विकास योजनांअंतर्गत झालेल्या कामांबाबत नागरिक प्रश्न उपस्थित करू लागले आहेत. ई-ग्रामस्वराज पोर्टलवरील व्हाउचर, मोजमाप पुस्तिका (एमबी), अंदाजपत्रके, खर्चाच्या नोंदी आणि प्रत्यक्ष कामांची स्थिती याबाबत माहिती व कागदपत्रे संकलित करण्याचे काम सिटी न्यूज सुपरफास्टकडून सुरू करण्यात आले आहे. अनेक ठिकाणी कागदोपत्री दाखविण्यात आलेली कामे प्रत्यक्षात झाली आहेत का, ती मंजूर अंदाजपत्रकानुसार व दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्यात आली आहेत का, तसेच खर्च केलेल्या निधीचा लाभ नागरिकांपर्यंत पोहोचला आहे का, याबाबत ग्रामस्थांशी संवाद साधून माहिती व पुरावे गोळा करण्यात येत आहेत. दरम्यान, परिसरात 'सीईओच आमच्या हाताशी; मग भीती आम्हाला कशाची?' अशी चर्चा रंगत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे या चर्चेमुळे ग्रामस्थांमध्ये संशयाचे वातावरण निर्माण झाले असून, संबंधित सर्व विकासकामांची निष्पक्ष चौकशी करून दोषी आढळल्यास तत्काळ कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे. सिटी न्यूज सुपरफास्टच्या हाती काही प्राथमिक कागदपत्रे तसेच ई-ग्रामस्वराज पोर्टलवरील विविध नोंदी लागल्या असून, त्यांची छाननी सुरू आहे. या छाननीतून समोर येणाऱ्या बाबी टप्प्याटप्प्याने जनतेसमोर मांडण्यात येणार असल्याचे समजते. जनतेच्या पैशातून होणाऱ्या प्रत्येक विकासकामाचा हिशोब जनतेसमोर आला पाहिजे, या भूमिकेतून सिटी न्यूज सुपरफास्टची

***या, ग्रामसेवकांचा प्रताप अंचळसह केनवडात तर नाही ना**
*** म्हणे सीईओ हाताशी; मग भीती आम्हाला कशाची..?**

माहिती संकलन मोहीम सुरू असून, 'अंचळ ही फक्त सुरुवात आहे; केनवड परिसरातील गावागावातील प्रश्नही आता प्रकाशझोतात आणले जातील,' अशी भावना नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

**परिसरातील गावागावातून सिटी न्यूज सुपरफास्टकडे गावकऱ्यांची स्वतःहून माहिती देण्याचा ओघ सुरू..!**

केनवड परिसरातील अनेक गावांमधून नागरिक भ्रमणध्वनीद्वारे विविध विकासकामे, व्हाउचर, एमबी, निधी खर्च तसेच कथित अनियमिततेसंदर्भातील माहिती आता स्वतःहून सिटी न्यूज सुपरफास्टपर्यंत पोहोचवत आहेत. सिटी न्यूज सुपरफास्टने सुरू केलेल्या या मालिकेमुळे अनेक गावकरी पुढे येत असून, उपलब्ध कागदपत्रे आणि पुरावे देण्यासाठीही तयारी दर्शवत आहेत. प्राप्त होणाऱ्या कागदपत्रांची पडताळणी करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणण्याचा प्रयत्न सुरू आहे. अंचळ ही फक्त सुरुवात असून, केनवड परिसरातील गावागावांतील विकासकामांची कागदपत्रे, व्हाउचर, एमबी व खर्चाच्या नोंदी गोळा करण्याचे काम सिटी न्यूज सुपरफास्टकडून वेगाने सुरू आहे. जनतेच्या पैशाचा हिशोब जनतेसमोर आणण्याच्या उद्देशाने ही मोहीम राबविण्यात येत असून, पुढील भागांत आणखी कोणत्या गावाचा कारभार समोर येणार, याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे. त्यामुळे 'आपल्या गावातही असा प्रकार झाला नाही ना?' असा प्रश्न आता नागरिक स्वतः विचारू लागले आहेत.

विशेष म्हणजे, आता गावकरीच स्वतःहून भ्रमणध्वनीद्वारे माहिती, कागदपत्रे आणि पुरावे सिटी न्यूज सुपरफास्टकडे पाठवत असून, परिसरातील अनेक धक्कादायक बाबी पुढील भागांत समोर येण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

## जेईई ॲडव्हान्स्ड परीक्षेत वाशीमच्या स्वर्गा कुटेचे सुयश

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●



नुकताच जाहीर झालेल्या आयआयटी (IIT) प्रवेशासाठीच्या 'जेईई ॲडव्हान्स्ड' (JEE Advanced) परीक्षेच्या निकालात वाशिमची कन्या स्वर्गा महेश कुटे हिने घवघवीत यश संपादन केले आहे. अत्यंत कठीण मानल्या जाणाऱ्या या परीक्षेत तिने मिळवलेल्या यशामुळे तिच्यावर आणि तिच्या कुटुंबावर संपूर्ण जिल्ह्यातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

स्वर्गा हिने सुरुवातीपासूनच अभ्यासात सातत्य ठेवले होते. तिने मिळवलेले हे यश केवळ तिच्या कुटुंबासाठीच नव्हे, तर संपूर्ण वाशिम जिल्ह्यासाठी अभिमानास्पद ठरले आहे. दर्जेदार शिक्षण, कठोर परिश्रम आणि योग्य मार्गदर्शनाच्या जोरावर ग्रामीण भागातील किंवा छोट्या शहरातील विद्यार्थीही देशातील सर्वोच्च पातळीवरील परीक्षेत उत्तम कामगिरी करू शकतात, हे तिने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. तिच्या या यशाबद्दल बोलताना तिच्या पालकांनी आणि शिक्षकांनी कमालीचा आनंद व्यक्त केला. स्वर्गाने आपल्या यशाचे श्रेय तिचे आई-वडील, शिक्षक आणि तिच्या कठोर परिश्रमांना दिले आहे. आगामी काळात आयआयटीमधून उच्च शिक्षण घेऊन देशाच्या सेवेत योगदान देण्याचा तिचा मानस आहे. तिच्या या यशाबद्दल विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून तिचे अभिनंदन केले जात असून, तिच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत.

## जागतिक सायकल दिनानिमित्त सायकल रॅली




●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व जिल्हा विधिज्ञ मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक सायकल दिनानिमित्त ३ जून २०२६ रोजी सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले.

या रॅलीचा शुभारंभ प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अध्यक्ष अनिल सुब्रमण्यम यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून करण्यात आला.

जिल्हा व सत्र न्यायालय येथून सुरू झालेली ही रॅली बसस्थानक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, पाटणी चौक, अकोला नाका, आर.टी.ओ. कार्यालय मार्गे पुन्हा जिल्हा न्यायालय परिसरात दाखल झाली. सायकलचा वापर वाढवून पर्यावरण संवर्धन, आरोग्यदायी जीवनशैली आणि इंधन बचतीचा संदेश देण्याच्या उद्देशाने या रॅलीचे आयोजन करण्यात आले.

यावेळी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव व्ही. जी. चौखंडे, मुद्रांक जिल्हाधिकारी राजेश वजिरे, जिल्हा विधिज्ञ संघाचे अध्यक्ष ॲड. अनुप बाकलीवाल, मुख्यन्यायरक्षक ॲड. परमेश्वर शेळके, जिल्हा विधिज्ञ मंडळाचे उपाध्यक्ष ॲड. वैभव तिफणे, लेखाधिकारी युसूफ शेख, सहायक सरकारी अभियोक्ता ॲड. विजय आरू, निशांत पतसंस्थेचे प्रादेशिक व्यवस्थापक सुरेश शिंदे, ॲड. विजय कांबळे, सहकार विभाग लेखापाल घमराव घुगे, चार्टर्ड अकाउंटंट मारोती भोयर, प्रा. कहाते, राजेश एकाडे, श्री. शर्मा, ॲड. केसवाणी तसेच न्यायालयीन कर्मचारी उपस्थित होते.

## रिसोड-हिंगोली रस्त्यावर अवैध हातभट्टीचा निघतो धूर!

●सिटी न्युज ब्युरो @रिसोड●

### राज्य उत्पादन शुल्क विभागाचे दुर्लक्ष



रिसोड पोलीस स्टेशन हद्दीतील हिंगोली रस्त्यावर अवैध हातभट्टी दारू निर्मितीचा धूर खुलेआम निघत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून केला जात आहे. पुण्यात विषारी दारू प्रकरणात अनेक निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाल्याची घटना अद्याप ताजी असतानाही, रिसोड शहरात अवैध गावठी दारू विक्री आणि निर्मिती सर्रास सुरू असल्याची चर्चा परिसरात रंगत आहे.

विशेषतः हिंगोली रोड परिसरात काही ठिकाणी उघडपणे गावठी दारूच्या भट्ट्या सुरू असल्याचे नागरिकांचे म्हणणे असून, याकडे स्थानिक पोलीस प्रशासन व राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप केला जात आहे. स्थानिकांच्या माहितीनुसार, काही ठिकाणी रस्त्यालगतच गावठी दारू तयार केली जात असून, त्याचा तीव्र वास ये-जा करणाऱ्या प्रवाशांनाही जाणवतो. एवढे असूनही संबंधित यंत्रणांकडून ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. पुण्यासारखी दुर्दैवी घटना घडल्यानंतरही रिसोड शहरात अवैध दारू व्यवसाय सुरूच असल्याने, राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाच्या कार्यक्षमतेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. अवैध दारूविरोधात कारवाई करणे हे संबंधित विभागाचे प्रमुख कर्तव्य असताना, प्रत्यक्षात मात्र कारवाई होत नसल्याची चर्चा शहरात सुरू आहे. हिंगोली रोड परिसरात दारू पिणाऱ्यांची वर्दळ वाढल्यामुळे रस्त्याने येणाऱ्या-जाणाऱ्या नागरिकांना, विशेषतः महिला व विद्यार्थ्यांना त्रास सहन करावा लागत असल्याच्या तक्रारी अनेकदा रिसोड पोलीस ठाण्यात करण्यात आल्याचेही स्थानिकांचे म्हणणे आहे. मात्र अद्याप ठोस उपाययोजना झालेली नसल्याची खंत नागरिक व्यक्त करीत आहेत.

### पुण्यासारखी घटना घडण्यापूर्वी कारवाईची मागणी

रिसोड शहरात विषारी दारूमुळे कोणतीही अनुचित घटना घडण्यापूर्वी स्थानिक पोलीस प्रशासन आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाने संयुक्त मोहीम राबवून शहरातील, विशेषतः हिंगोली रोड परिसरातील अवैध गावठी दारू व्यवसाय पूर्णतः बंद करावा, अशी मागणी प्रवासी, स्थानिक नागरिक तसेच सायंकाळी क्रीडा संकुल परिसरात फिरण्यासाठी येणाऱ्या नागरिकांकडून करण्यात येत आहे. दारूच्या भट्ट्यांमधून निघणारा धूर, तसेच मद्यधुंद अवस्थेतील काही व्यक्तींची वर्दळ यामुळे एखादी गंभीर दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार, असा सवाल सरावासाठी येणाऱ्या युवक-युवतींच्या पालकांकडून उपस्थित केला जात आहे. 'पुण्यातील दुर्घटनेतून प्रशासनाने धडा घ्यावा आणि रिसोडातील अवैध हातभट्टी व्यवसायावर तातडीने कारवाई करावी,' अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## वादळी वाऱ्याचा कहर; सोलर पॅनलचे नुकसान!

●सिटी न्युज ब्युरो @रिसोड●



मान्सूनपूर्व अवकाळी वादळी वाऱ्याने दि. ०१ जून २०२६ रोजी सायंकाळी सुमारे सात वाजण्याच्या सुमारास केनवड परिसराला जोरदार वादळी वाऱ्याने तडाखा दिला. या वादळामुळे केनवड सह अंचळ, कुकसा, पिंपरी सरहद्द, नावली तसेच परिसरातील अनेक गावांतील शेतकऱ्यांच्या शेतातील सोलर पॅनल व त्यावरील संरचनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

जोरदार वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी सोलर पॅनल उखडले, लोखंडी फ्रेम वाकल्या तर काही ठिकाणी गोठ्यांवरील टिनपत्रे उडून गेली. तसेच झाडे उन्मळून पडल्याने शेतकऱ्यांचे आणखी नुकसान झाले आहे. अचानक आलेल्या वादळामुळे शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसला आहे. परिसरातील बहुतांश गावांमध्ये नुकसान झाल्याचे चित्र असून अनेक शेतकरी आपले नुकसान पाहून हतबल झाले आहेत. शेतीसाठी वीजपुरवठ्याचा पर्याय म्हणून उभारण्यात आलेल्या सोलर प्रकल्पांचे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय नविन नगर परिषद कॉम्प्लेक्स, रविवार बाजार, वाशिम जि. वाशिम येथे प्रकाशित केले. ■ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ■ **संपर्क** - 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.-MAHMAR/26/A3072, RRC Helpline No. 8484842135